# बँकिंग प्रणालीचा गैरवापर करून पुणे येथील महिलेच्या बँक खात्यातून १७ लाख २५ हजार रुपयांची चोरी

## राहात्यातील तरुणाला दिल्ली सायबर क्राईम पोलिसांकडून अटक

**राहाता (वार्ताहर)–** पुणे येथील एका महिलेच्या बचत खात्यातील आयएमपीएस इमिजिएट पेमेंट सर्व्हिसफ आणि युपीआय युनिफाइड पेमेंट्स इंटरफेसचा वापर करून, म्हणजेच या बँकिंग प्रणालीद्वारे आर्थिक व्यवहार करून, जानेवारी २०२३ ते मे २०२५ पर्यंत पुणे वानवडी शाखेतील ॲक्सिस बँकेच्या बचत खात्यातून वेळोवेळी खाते धारकाच्या माहितीशिवाय अनेक अनधिकृत व्यवहार करून १७ लाख २५ हजार रुपये लुटण्याचा प्रकार राहाता येथील एका तरुणाने केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. सदर महिलेच्या बँक खात्यातून १७ लाख रुपयांची चोरी केल्याप्रकरणी दिल्ली येथील सायबर क्राईम ब्रँच पोलिसांनी राहाता शहरात राहणाऱ्या आनंद वसंत सोमवंशी या तरुणाला त्याच्या घरातून ताब्यात घेऊन दिल्ली येथे चौकशीसाठी नेण्यात आले आहे.

सदर घटनेत फसवणूक झाल्याप्रकरणी बँक खातेदार ईशान लाहिरी यांचा मुलगा इंद्रजित लाहिरी, रा. दिल्ली याच्या तक्रारीवरून सायबरसेल, गुन्हे शाखा, दिल्ली येथे गुन्हा नोंदवण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी बँक स्टेटमेंट तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे राहाता येथील आनंद सोमवंशी याच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर दिल्ली पोलिसांनी महाराष्ट्रातील राहाता पोलिसांच्या मदतीने आरोपी आनंद सोमवंशी याला ताब्यात घेतले आणि पुढील कारवाईसाठी दिल्ली येथे नेले आहे. तक्रारदाराच्या ॲक्सिस खात्याशी संबंधित आयपी लॉगचे अधिक विश्लेषण करण्यात आले. जिओच्या आयपीडीआरने उघड केले की आनंद सोमवंशी यांच्याकडे नोंदणीकृत असलेला मोबाईल क्रमांक बँक प्रणालीमध्ये प्रवेश करण्यासाठी वापरला गेला होता. ज्यामुळे त्याचा गुन्ह्याशी आणखी संबंध जोडला गेला. राहाता पोलिसांच्या मदतीने आरोपीला दिल्ली पोलिसांनी राहाता येथून अटक केली. दिल्ली पोलिसांनी केलेल्या खुलाशात म्हटले आहे, आरोपीने तक्रारदाराच्या संबंधित खात्याचा वापर करून फसवणूक केली, रक्कम हस्तांतरित केली आणि बेकायदेशीरपणे तक्रारदाराची माहिती बदलली. १७ लाख २५ हजार रुपयांच्या सायबर फसवणुकीसह गंभीर गुन्हे केले. दिल्ली पोलिसांनी आरोपी आनंद वसंत सोमवंशी याच्याकडून एक फोन, महत्त्वाची कागदपत्रे, बँकांची पासबुक, चेकबुक, डेबिट कार्ड जप्त केले आहे. आरोपीला लँटिन कोर्टासमोर हजर केले जाणार आहे. आरोपीविरुद्ध पोलिस स्टेशन गुन्हे शाखा, दिल्ली येथे एफआयआर क्रमांक १५०/२०२५, बी एन एस कलम ३१८(४)/३१९(२) नुसार गुन्हे दाखल झाले आहेत. आरोपी आनंद सोमवंशी यांना दिल्लीतील सक्षम न्यायालयात सुरक्षितपणे आणण्यासाठी आणि हजर करण्यासाठी ७२ तासांच्या कालावधीसाठी ट्रान्झिट रिमांड मंजूर करण्याची मागणी गुन्हे शाखा, दर्यागंज दिल्ली येथील सायबर सेल शाखेचे सीनियर इन्स्पेक्टर प्रमोद कुमार यांनी केली आहे.

## २२० केव्ही विद्युत केंद्र भूमीपूजनाच्या कार्यक्रमानंतर

# दत्तनगरमध्ये सर्वपक्षियांमध्ये ‘चाय पे चर्चा’

**टिळकनगर (वार्ताहर)–** श्रीरामपूर एमआयडीसी येथील २२० के.व्ही. विद्युत केंद्राच्या भूमीपूजनाचा कार्यक्रम संपवून ना. विखे पाटील मार्गस्थ झाल्यानंतर, दत्तनगर येथील एका चहाच्या टपरीवर आ. हेमंत ओगले यांच्यासह सर्वपक्षिय नेते व पदाधिकाऱ्यांमध्ये ना. विखे पाटील यांनी कार्यक्रमाप्रसंगी केलेल्या वक्तव्यावरुन चांगलीच चर्चा रंगली.

▸ राजकीय व्यासपीठावर एकमेकांवर कुरघोडी करणारे, नेते व कार्यकर्त्यांची ‘चाय पे चर्चा’ ऐकून ग्रामस्थांना आश्चर्याचा धक्का बसला. शहरात, वॉर्डात आणि गावात आम्हाला एकमेकांबद्दल वाईट करून, केवळ सत्तेसाठी भांडणारे एकाच व्यासपीठावर बसतात, हे पाहून एका कार्यकर्त्याच्या भावना अनावर झाल्या. त्याने कुणामध्येही वैर नसावे, असे म्हणत गावखेड्यात आणि शहरी भागात सत्ता मिळविण्यासाठी ही मंडळी सामान्य मतदारांत वाद लावून, पारंपरिक सत्ता भोगत आहेत, याचे आम्हाला दुःख वाटते, अशी तिखट प्रतिक्रीया दिली.

एमआयडीसी येथील २२०/३३ के.व्ही. विद्युत केंद्राच्या भूमीपूजनाच्या कार्यक्रमात पालकमंत्री विखे पाटील यांनी आमदार ओगले यांना श्रीरामपूर तालुक्याच्या विकासासाठी हातभार लावू, असे म्हणत जोडीदार हा मतदारसंघातील विकासकामे करणारा पाहिजे, त्यामुळे चुकीची संगत धरू नका, तुमचे भविष्य उज्वल आहे, असा सल्ला दिला. ना. विखे पाटील यांनी दिलेल्या या सल्ल्याबाबत कार्यक्रम संपवून ना. विखे पाटील मार्गस्थ झाल्यानंतर दत्तनगर येथील एका चहाच्या टपरीवर चांगलीच ‘चाय पे चर्चा’ रंगली.

यावेळी भाजपाचे भजे, काँग्रेसचा चहा व मित्र पक्षांचे पाणी यावर सर्वांनी ताव मारून एकमेकांवर टीका-टिप्पणी केली. तसेच आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत चर्चा झाली. प्रसंगी आ. हेमंत ओगले, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नानासाहेब शिंदे, माजी जि.प. सभापती बाबा दिघे, जिल्हा बँकेचे संचालक करण ससाणे, रिपाईचे भीमा बागुल, चांगदेव ढोकचौळे, बाबासाहेब ढोकचौळे, सुभाष गायकवाड, प्रेमचंद कुंकूलोळ, भाजपाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, भाजपाचे तालुका अध्यक्ष बाबासाहेब चिडे, संजय गांधी योजनेचे तालुकाध्यक्ष गणेश मुदगुले, संदीप मगर, ज्ञानेश्वर मुरकुटे, प्रेमचंद कुंकूलोळ, जनाभाऊ खाजेकर, सागर भोसले, सुरेश जगताप, अनिस शेख, सनी मंडलिक, राजेंद्र सोनवणे, शहाजान बागवान, रमेश कोल्हे, किरण खंडागळे, सुरेश शिवलकर, आनंद चावरे, राजू मगर, संजय बोरगे, सुधीर ब्राह्मणे, मोहन आव्हाड, सुनील शिरसाठ, प्रदीप गायकवाड, सुरेश शिवलकर, संदीप बागुल, नवाज शेख, दिनेश तरटे आदी उपस्थित होते.

# सर्व डब्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणार

## प्रवासी सुरक्षा वाढविण्यासाठी भारतीय रेल्वेचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली–** भारतीय रेल्वेचं जाळं संपूर्ण देशभरात पसरलं आहे. दररोज लाखोंच्या संख्येत प्रवाशी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ट्रेनने प्रवास करत असतात. याच प्रवाशांच्या सुरक्षेसाठी भारतीय रेल्वेने आता एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. प्रवासी डब्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे प्रायोगिक स्वरूपात बसवण्यात आल्यावर त्याचे सकारात्मक परिणाम पाहता, भारतीय रेल्वेने सर्व डब्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमामुळे प्रवाशांच्या सुरक्षेत लक्षणीय वाढ होईल.

असामाजिक तत्वे आणि संघटित टोळ्या निष्पाप प्रवाशांचा गैरफायदा घेतात, म्हणूनच सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे अशा घटनांमध्ये मोठी घट होईल. तसेच प्रवाशांच्या गोपनीयतेचा विचार ठेवून, हे कॅमेरे डब्यांच्या दरवाज्याजवळील सार्वजनिक वावरण्याच्या भागामध्ये बसवले जाणार आहेत.

रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले की, उत्तर रेल्वेच्या इंजिन आणि डब्यांमध्ये यशस्वी चाचण्या पार पडल्या आहेत. रेल्वेमंत्री यांनी ७४,००० डब्यांमध्ये आणि १५००० रेल्वे इंजिन मध्ये सीसीटीव्ही बसवण्यास मंजुरी दिली आहे. प्रत्येक प्रवेशद्वाराजवळ २ कॅमेरे असतील, प्रत्येक डब्यामध्ये ४ डोम प्रकारचे सीसीटीव्ही कॅमेरे असतील. एक पुढील बाजूस, एक मागच्या बाजूस आणि दोन्ही बाजूंना प्रत्येकी एक अश्याप्रकारे प्रत्येक इंजिनमध्ये ६ सीसीटीव्ही कॅमेरे असतील. प्रत्येक इंजिनच्या केबिनमध्ये (पुढील आणि मागील) १ डोम सीसीटीव्ही कॅमेरा आणि २ डेस्क माउंटेड मायक्रोफोन बसवले जातील.

सीसीटीव्ही कॅमेरे सर्वोत्तम तांत्रिक विशिष्टतेसह आणि एसटीक्यूसी प्रमाणित असतील. यासाठी रेल्वेमंत्र्यांनी सर्वोत्तम दर्जाची उपकरणे वापरण्याचा आग्रह धरला आहे. त्यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले की, १०० किमी प्रतितास किंवा त्यापेक्षा जास्त वेगाने धावणाऱ्या गाड्यांमध्ये आणि कमी प्रकाशातही उच्च दर्जाची चित्रीकरण फीत उपलब्ध होईल, याची खात्री करावी. तसेच इंडिया एआय मिशनच्या सहकार्याने सीसीटीव्ही फुटेजवरील डेटावर एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) वापरण्याच्या शक्यता शोधण्याचेही आवाहन केले.

# शेवगाव येथील तरुणीवर आळंदीत अत्याचार

**शेवगाव (तालुका प्रतिनिधी)–** एका १९ वर्षीय मुलीस बळजबरीने लग्न लावून देण्यासाठी चारचाकी वाहनामध्ये बसवून आळंदी येथे नेले. लग्नासाठी नकार दिल्याने तिला एका खोलीत डांबून तिच्यावर बळजबरीने अत्याचार करण्यात आले. याप्रकरणी पिडीत मुलीच्या फिर्यादीवरुन पाच जणांविरुद्ध शेवगाव पोलीस ठाण्यात कलम ६४,१२७(२), ८७,३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अण्णासाहेब प्रल्हाद आंधळे, प्रवीण प्रल्हाद आंधळे, अनोळखी वाहन चालक (तिघे रा. सोनेसांगवी, ता. शेवगाव), सुनिता अभिमन्यू आंधळे, अभिमन्यू भगवान आंधळे रा. आळंदी, पुणे अशी आरोपींची नावे आहेत. यातील आरोपी महिला ही एक अध्यात्मिक क्षेत्रातील आहे.

याबाबत फिर्यादीत म्हटले आहे की, १९ वर्षीय फिर्यादी मुलीस गुरुवार दि. ३ रोजी वरखेड ता. शेवगाव येथून अण्णासाहेब आंधळे, प्रवीण आंधळे, सुनिता आंधळे, अभिमन्यू आंधळे यांच्यासह वाहन चालक यांनी शेतात चल असे म्हणून बळजबरीने काळ्या रंगाच्या इर्टिगा गाडीमध्ये बसविले. त्यानंतर आरोपींनी दमदाटी करुन आळंदी, पुणे येथे नेले. तेथे लग्नाला नकार दिल्याने आरोपीनी एका खोलीत डांबून ठेवले. तेथे बळजबरीने तिच्यावर शारीरिक संबंध ठेवून अत्याचार केला असे पिडीत मुलीने फिर्यादीत म्हटले आहे. आळंदी परिसरात या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. याबाबत शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास विशाल लहाने हे करीत आहेत.

# विजयासाठी १९३ धावांचे लक्ष्य

## भारत ४ बाद ५८ धावा

**लंडन–** भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळली जात आहे. या मालिकेतील तिसरा सामना लॉर्ड्सवर खेळाला जात आहे. या सामन्यात इंग्लंडचा दुसरा डाव संपला असून भारताला विजयासाठी १९३ धावांचे लक्ष्य मिळाले आहे. दरम्यान, भारताला एका पाठोपाठ धक्के मिळाले. त्यामुळे भारत ४ बाद ५८ धावा केल्या होत्या.

भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील तिसरा सामना ऐतिहासिक लॉर्ड्सवर खेळाला जात आहे. या सामन्यात भारतीय गोलंदाजांनी आपला दबदबा सिद्ध केला आणि इंग्लंडला दुसऱ्या डावात १९२ धावांवर रोखले. आता भारताला हा सामना जिंकण्यासाठी १९३ धावा कराव्या लागणार आहेत. दुसऱ्या डावात इंग्लडच्या कोणत्याच फलंदाजाला मैदानावर टिकाव धरता आला नाही. भारताकडून वॉशिंग्टन सुंदरने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. भारतीय संघ या मलिकते आतापर्यंत फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही प्रकारात चांगली कामगिरी करताना दिसत आहे. इंग्लंडमध्ये भारतीय फलंदाज चांगली फलंदाजी करत आहेत तर गोलंदाज देखील विकेट काढताना दिसत आहेत. लॉर्ड्स येथे खेळवण्यात येत असलेल्या तिसऱ्या कसोटीच्या पहिल्या डावात इंग्लंडने ३८७ धावा केल्या. यात जो रूटने शतक झळकावले. तर भारताकडून बुमराहने ५ विकेट्स घेऊन इंग्लंडला रोखण्यात मोठी भूमिका बजावली. घेतल्या. इंग्लंडच्या ३८७ धावांच्या प्रत्युउत्तरात टीम इंडियाने केएल राहुलने शानदार शतकाच्या जोरावर ३८७ धावा केल्या.

**इंग्लंडचा दूसरा डाव**

इंग्लंडने तिसऱ्या दिवशीच्या अखेरीस बिनबाद २ धावा केल्या होत्या. चौथ्या दिवसाचा खेळ सुरु झाला तेव्हा इंग्लडची सुरवात चांगली झाली नाही. इंग्लंडचा सलामीवीर बेन डकेट १२ धावांवर आउट झाला. त्यांनतर इंग्लंडच्या विकेट जात राहिल्या. ऑली पोपला ४, झॅक क्रॉली २२, हॅरी ब्रुक २३, जो रूट ४०, हॅरी बेन स्टोक्स ३३, जेमी स्मिथ ८, ख्रिस वोक्स ८, कार्स १, शोएब बशीर २ धावा करून बाद झाले, तर जोफ्रा आर्चर ५ धावांवर नाबाद राहिला. भारताकडून वॉशिंग्टन सुंदरने २२ धावा देत सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या, तर मोहम्मद सिराज आणि जसप्रीत बुमराह यांनी प्रत्येकी २, नितीश कुमार रेड्डी आणि आकाश यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

# स्थानिक स्वराज्यसाठी २४ हजार कर्मचाऱ्यांची कुमक; जाहीर होणाऱ्या प्रभागरचनकडे इच्छुकांचे लक्ष

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** सुमारे साडेतीन वर्षापासून रखडलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समित्या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगासह जिल्हा निवडणूक विभागाची पूर्व तयारी सुरु झाली आहे. आज (सोमवारी) जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या ७५ गट आणि १५० गणांची प्रारूप प्रभाग रचना जाहीर होणार आहे. दरम्यान, जाहीर होणाऱ्या या प्रभाग रचनेकडे इच्छुकांचे लक्ष राहणार असून या निवडणुकीसाठी जिल्ह्यात २३ हजार ६३३ कर्मचाऱ्यांची गरज भासणार आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाकडून संबंधीत कर्मचाऱ्यांची माहिती संकलित करण्यास सुरू करण्यात आली आहे.

साधारण दिवाळीनंतर नगरसह राज्यात जिल्हा परिषदा व पंचायत समितीच्या निवडणूका होणार आहेत. या निवडणूकांची पूर्व तयारी राज्य निवडणूक आयोगासह जिल्हा निवडणूक विभागाकडून सुरू करण्यात आली आहे. यासाठी पहिल्या टप्प्यात जिल्हा परिषदेच्या ७५ गटांची आणि पंचायत समितीच्या १५० गणांची सुधारित प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यात येणार आहे. ही प्रभाग रचना जाहीर झाल्यावर त्यावर हरकती आणि सुचना घेण्यात येणार आहेत. दरम्यान, मागील आठवड्यात राज्य निवडणूक आयोगाने निवडणूका होणाऱ्या जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांकडून निवडणुकीसाठी आढावा घेतला आहे. यात मतदान केंद्र, मतदान यंत्रांची उपलब्ध यासह आवश्यक असणाऱ्या निवडणूक अधिकारी-कर्मचारी यांची माहिती अद्यावत करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच निवडणुकीसाठी आवश्यक असणाऱ्या मास्टर ट्रेनर यांचा माहितीचा आढावा घेण्यात आला आहे.

नगर जिल्ह्यात स्थानिक स्वराज्यच्या निवडणुकीसाठी २३ हजार ६०५ अधिकारी- कर्मचाऱ्यांची कुमक गरजेची असून यासह १४ तालुक्याचे १४ निवडणूक अधिकारी, १४ सहाय्यक निवडणूक अधिकारी असे २३ हजार ६३३ कर्मचाऱ्यांची माहिती संकलनाचे काम जिल्हा प्रशासनाकडून सुरू करण्यात आले आहे. या कर्मचाऱ्यांची निवडणूक कामी नेमणूक करणे, त्यांना जबाबदाऱ्या वाटून देणे, निवडणूक कामकाजाचे प्रशिक्षण आदी कार्यक्रम जिल्हा प्रशासनाकडून राबवण्यात येणार आहे.

**आजपासून प्रभागनिहाय इच्छुकांची गोळाबेरीज**

जिल्ह्यात गट आणि गणाची अंतिम प्रभाग रचना पुढील महिन्यांत १८ ऑगस्टला होणार आहे. दरम्यान प्रसिध्द होणाऱ्या प्रभागात कोणती गावे राहणार याची गोळा बेरीज आजपासून सुरू होणार आहे. तसेच झालेली प्रभाग रचना यात दोष असल्यास त्याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे अपिल करता येणार आहे. या अपिलावर सुनावणी होवून राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने अंतिम प्रभाग रचना जाहीर होणार आहे. आज जाहीर होणाऱ्या प्रभाग रचनेवर निवडणूकांचे पुढील भवितव्य अवलंबून राहणार आहे.

## डाकले महाविद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** येथील डाकले महाविद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील व सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेला रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्या मीनाताई जगधने व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे, उपप्राचार्य प्रो.डॉ.सादिक सय्यद, विभागप्रमुख डॉ.अनिकेत खत्री, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पौर्णिमा गुजर, प्रा. सुभाष देशमुख आदींनी अभिवादन केले. याप्रसंगी मा. मीनाताई जगधने यांनी बोलताना कर्मवीर भाऊराव यांनी रयत शिक्षण संस्थेच्या पायाभरणीत व विकासात स्वतःचे जीवन पणाला लावले, आणि सौ. वहिनींनी त्यांना मोलाची साथ दिली. त्यामुळे रयत सेवकांसाठी अण्णा व वहिनी हेच आद्यगुरु आहेत, असे प्रतिपादन त्यांनी केले. प्राचार्य डॉ. कांबळे यांनी ही मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

पान १ वरुन

## पालिकांसाठी सदस्य संख्या आरक्षणासह निश्चित

१२ नगरपरिषद व १ नेवासे नगरपंचायत अशा १२ पालिकांमधून निवडणुका प्रस्तावित आहेत. त्याच्या प्रभाग रचनेचा कार्यक्रम सुरू आहे. त्यानुसार प्रारूप प्रभाग रचना २२ ते २८ ऑगस्ट दरम्यान हरकतीसह प्रसिद्ध होणार आहेत तर ३ ते ६ ऑक्टोबर दरम्यान अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध केली जाणार आहे.

**असे असेल आरक्षण**

▸ शेवगाव- एकूण संख्या २४, महिला राखीव १२, अनुसूचित जाती ४, जमाती ०, नामाप्र ६ व सर्वसाधारण ७, राहुरी- एकूण संख्या २४, महिला राखीव १२, अनुसूचित जाती ४, जमाती २, नामाप्र ६ व सर्वसाधारण ६. श्रीगोंदे- एकूण संख्या २२, महिला राखीव ११, अनुसूचित जाती ३, जमाती ०, नामाप्र ६ व सर्वसाधारण ६. पाथर्डी- एकूण संख्या २०, महिला राखीव १०, अनुसूचित जाती २, जमाती ०, नामाप्र ५ व सर्वसाधारण ६. देवळाली प्रवरा- एकूण संख्या २१, महिला राखीव ११, अनुसूचित जाती ३, जमाती १, नामाप्र ६ व सर्वसाधारण ५. शिर्डी- एकूण संख्या २३, महिला राखीव १२, अनुसूचित जाती ५, जमाती १, नामाप्र ६ व सर्वसाधारण ६. नेवासे (नगरपंचायत) - एकूण संख्या १७, महिला राखीव ९, अनुसूचित जाती २, जमाती १, नामाप्र ५ व सर्वसाधारण ५.

## उत्तम जिंदगीच्या तरतुदीमुळे शिक्षक सभासदाच्या खिशाला कात्री!

असल्याचे दिसून आले. यावेळी सत्ताधाऱ्यांना जाब विचारण्यासाठी विरोधक नसल्याने काही सभासदांच्या सुचनानंतर सर्व विषय मंजूरीला टाकत अवघ्या सव्वा तासात ही सभा आटोपती घेण्यात आली. यावेळी विरोधी मंडळ असणाऱ्या पुरोगामी मंडळाने सभेकडे पाठ फिरवल्याने सत्ताधारी मंडळाचे काम सोपे झाले. माध्यमिक शिक्षक सोसायटीची ८२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी नगरमध्ये पार पडली.

दुपारी १ वाजता नगरमधील एका लॉनमध्ये सभेच्या कामकाजाला सुरूवात झाली. यावेळी संचालक सुधीर कानवडे यांनी स्वागत केल्यावर चेअरमन शिंदे यांनी सभेचे प्रस्ताविक केले. यात यंदा सोसायटीची सभा घेण्यास उशीर झाला. यापुढे शाळा सुरू होताच जूनअखेर सर्वसाधारण सभा घेण्यात येईल. मागील वर्षी ४०० सभासद सेवानिवृत्त झाल्याने त्यांना देण्यात येणारा कृतज्ञता निधीची रक्कम २३ हजारांवरून १७ हजार करण्यात आली. यामुळे नवीन कृतज्ञता निधीचा विषय सभेत मांडण्यात आला. तसेच मयत सभासदांचे २ कोटी ९१ लाखांचे कर्ज माफ केले. सहकारच्या आदेशानूसार संस्थेच्या उत्तम जिंदगीसाठी २ कोटी ४७ लाखांची तरतूद करावी लागली. याचा परिणाम थेट नफ्यावर झाला असून यामुळे सभासदांना ६ टक्केच लाभांश देता आल्याची माहिती शिंदे यांनी यावेळी दिली. त्यानंतर मागील सभेच्या इतिवृत्ताचा विषय मंजूरीसाठी ठेवण्यात आला.

सभेत दहा विषयपत्रिकेवर मंजूरीसाठी होते. यावेळी संचालक बाबासाहेब बोडखे यांनी पुढील २५ वर्ष आदर्श ठरेल असा कारभार करणार असल्याचा विश्वास व्यक्त करत २०२४-२५ च्या ताळेबंद व नफातोटा पत्रक मंजूर करून नफा वाटणीस मंजूरी द्यावी, तसेच २०२५-२६ च्या अंदाजपत्रक मंजूरीच्या विषयास मंजूरी द्यावी, असे आवाहन केले. त्यानंतर सभासद देवीदास खेडकर, संतोष कानडे, उध्दव गायकवाड, भाऊसाहेब जिवडे, भाऊसाहेब धनवटे, भाऊसाहेब खोसे, अमोल शिरसागर, रामदास जंजीरे, इस्माल शेख, संदीप पानमळ यांच्या अन्य शिक्षक सभासदांनी विविध सुचना केल्या. दुपारी एक वाजता सुरू झालेली सर्वसाधारण सभा सव्वा दोन वाजता संपली.

**वर्षानूवर्षे विरोध करणारे बनले सत्ताधारी**

माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या राजकारणात गेल्या १५ ते २० वर्षापासून टोकाचा विरोध करणारे शिक्षक नेते यंदा संचालक झाल्याने, तसेच प्रमुख विरोधक असणाऱ्या पुरोगामी मंडळाने सभेवर बहिष्कार घातल्याने शिक्षक सोसायटीची सभा एकाप्रकारे एकतर्फी झाल्याचे दिसून आले. संचालक मंडळाने मांडलेले सर्व विषय त्यांच्या समर्थकांनी एका दमात मंजूर केले.

**४० टक्क्यांपेक्षा अधिक खुर्च्या रिकाम्याच !**

नगर शहरात रविवारी झालेल्या माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या सर्वसाधारण सभेच्या वेळी मंगल कार्यालयात मांडण्यात आलेल्या एकूण खुर्च्यांपैकी ४० टक्क्यांपेक्षा अधिक खुर्च्या रिकाम्या होत्या. या ठिकाणी शिक्षक सभासदांसाठी जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. सभा सुरू असतांना आणि संपल्यानंतर देखील अनेक शिक्षकांनी सभेकडे दुर्लक्ष करत जेवणावर ताव मारल्याचे दिसून आले.

**विरोधकांवर खापर फोडण्यासाठी लाभांश घटवला**

शिक्षक सोसायटीत काही महिन्यांपूर्वी सत्तेत आलेल्या स्वाभिमानी पुरोगामी मंडळाने मागील सत्ताधाऱ्यांवर खापर फोडण्यासाठी लाभांश घटवला. मागील वर्षीच्या तुलनेत ठेवी १६ कोटींनी घटल्या. त्यासाठी नफ्यातून तब्बल साडेतीन कोटी व उत्तम जिंदगीसाठी २ कोटी ४७ लाखांची तरतूद करण्यात आली. यामुळे सोसायटीचा नफा कमी झाला असून सत्ताधाऱ्यांना यातील उत्तम जिंदगीचे पैसे वाचवता आले असते. मात्र, विरोधकांवर खापर फोडण्यासाठी शिक्षक सभासदांचा लाभांश कमी करण्यात आल्याचा आरोप पुरोगामी मंडळाकडून करण्यात आला.

**लेखा परिक्षणासाठी ८५ लाख**

दरवर्षी सोसायटीच्या सर्वसाधारण सभेत लेखा परिक्षणाच्या फीवर करण्यात येणाऱ्या वारेमाप उधळपट्टीवर टीका करण्यात येत होती. मात्र, आताच्या सत्ताधारी मंडळाने सोसायटीच्या लेखा परिक्षणासाठी यंदा देखील ८५ लाखांची तरतूद केलेली आहे. तसेच ही केवळ तरतूद केलेली आहे. सर्वात कमी फी घेणाऱ्यांकडून सोसायटीचे ऑडीट करण्यात येणार असल्याचे यावेळी चेअरमन शिंदे यांनी जाहीर केले. दरम्यान, मागील वर्षीच्या तुलनेत यंदा केवळ ६० टक्क्यात लेखा परीक्षक उपलब्ध करू देतो, असे आवाहन माजी संचालक भिमराव खोसे यांनी संचालक मंडळाला केले आहे.

## कोतूळ येथे १ कोटीचा गुटखा पकडला



या पथकाचे प्रमुख परिविक्षाधीन पोलीस उपाधीक्षक संतोष खाडे यांनी धडक कारवायांचा सिलसिला सुरूच ठेवला आहे. कोतूळ येथे केळी रस्त्याच्या कडेला शेडमध्ये अवैधरित्या गुटखा साठवून ठेवला असल्याची गोपनीय माहिती त्यांना मिळाली. त्यानुसार विशेष पथकाने रविवारी छापेमारी करुन भागीदारीमध्ये गुटख्याची साठवणूक करुन विक्री करणारे शोएब शाविद काजी व शाहिद हुसेन लतीफ पटेल या दोघांना ताब्यात घेतले. या कारवाईत त्यांच्यासह इतर दहा जणांनाही ताब्यात घेतले असून, गुटखा, वाहने आणि रोख रक्कम असा एकूण १ कोटी १ लाख ७४ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी अकोले पोलिसांत रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. या धडक कारवाईने अवैध धंदे चालकांत खळबळ उडाली आहे.

## कुकडीचा साठा ५० टक्क्यांवर

भरले आहे. पिंपळगाव जोगे धरणातील पाणीसाठा नेहमी मायनसमध्ये असे पण आता हे धरण २५ टक्के भरले आहे. घोड धरणातील पाणीसाठा ८२ टक्के आहे. गतवर्षी या समूह धरणांमध्ये केवळ ३१२० दलघफू (११ टक्के) पाणीसाठा होता. गतवर्षीच्या तूलनेत यंदा चौपट अधिक पाणीसाठा आहे.

## शनिशिंगणापूर :४ ॲप मालकांवर गुन्हा दाखल

देणगी न देता संकेतस्थळ व ॲपधारक, मालक यांनी त्यांचे साथीदारासह श्री शनैश्वर मंदिर शनिशिंगणापूर येथील शनि महाराजांच्या शिळेचा फोटो, शनी मंदिराचा व महाद्वाराचा फोटो वापरला व संकेतस्थळ/ॲपचे धारक, मालक यांचे कोणतेही अधिकृत पुजारी शिंगणापूर येथे उपलब्ध नसताना देखील त्यांनी त्यांचे पुजारी मार्फत श्री शनैश्वर देवस्थान येथे शनि देवाची पूजा अभिषेक व तेल चढावा केला जाईल असा खोटा मजकूर फसवणुकीच्या उद्देशाने संकेतस्थळाच्या माध्यमातून ऑनलाईन प्रसारित केला आहे तसेच ऑनलाईन पद्धतीने भाविकांकडून अनियमित दराने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी रक्कम स्वीकारून शनैश्वर देवस्थान व भाविकांची फसवणूक केली आहे. याबाबत वरिष्ठांनी अर्जदार सुरक्षा अधिकारी गोरक्षनाथ भीमाशंकर दरंदले शनैश्वर देवस्थान व संस्थानचे कार्यकारी अधिकारी गोरक्षनाथ केरुजी दरंदले यांना वेळोवेळी संपर्क साधून संकेतस्थळ/ॲपधारक मालक व त्यांचे साथीदार यांच्यावर फिर्याद देण्यास कळवूनही त्यांनी फिर्याद न दिल्याने सदर प्रकरण संवेदनशील व भाविकांच्या भावनांशी संबंधित असल्याने भाविकांची व संस्थानची होणारी फसवणूक थांबण्यासाठी वरिष्ठांच्या आदेशाने फिर्याद दिली आहे.

याप्रकरणी शिंगणापूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नं. १६५/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३३६(३), ३ (५) सह माहिती व तंत्र तंत्रज्ञान अधिनियम चे कलम ६६-ड प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास अहिल्यानगर सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम हे करत आहेत.